# कृषी सल्ला : राहुरी विभाग

## हवामान सारांश

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश काही ठिकाणी अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## मका

- काढणी व साठवणूक
- परिपक्व झालेल्या खरीप मका पिकाची कापणी पूर्ण करून घ्यावी. कणसे पिवळसर, दाणे कडक झाल्यानंतर कणसे खुडून काढावीत.
- कणसे दोन ते तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर कणसाच्या वरील आवरण काढून मका सोलणी यंत्राच्या साह्याने दाणे वेगळे करावेत. दाण्यांतील पांढरी तुसे, बिट्ट्याचे तुकडे वेगळे करण्यासाठी उफणणी करावी. दाणे चांगले उन्हात वाळवून दाण्यांतील आर्द्रता १२ टक्क्यांपर्यंत आल्यानंतर साठवण करावी.

## कापूस

- वेचणी
- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात. या पऱ्हाट्यांचा वापर कंपोस्ट खत तयार करण्यासाठी करता येतो. या माध्यमातून किडींच्या सुप्त अवस्था नष्ट होतील.

## बाजरी

- काढणी व साठवणूक
- परिपक्व झालेल्या बाजरी पिकाची सकाळच्या वेळी काढणी करून घ्यावी. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

## सूर्यफूल

- काढणी व साठवणूक
- सूर्यफूल पीक परिपक्व झाले असल्यास काढणी करून मळणी करावी. धान्य स्वच्छ करून उन्हात वाळवून कोरड्या जागी साठवणूक करावी.



सोयाबीन मळणीची कामे करून घ्यावीत.

## भुईमूग

- काढणी व साठवणूक
- पीक काढणीच्या वेळी झाडे उपटल्यानंतर शेंगाची ताबडतोब तोडणी करावी. साधारणतः ४ ते ५ दिवस शेंगा उन्हामध्ये वाळण्यास ठेवाव्यात. जेणेकरून शेंगामधील ओलावा ८ ते १० टक्क्यांपर्यंत येईल.

## सोयाबीन

- काढणी व साठवणूक
- सोयाबीन पिकाची काढणी करून काडाचे छोटे-छोटे ढीग करून प्रखर सूर्यप्रकाशामध्ये शेतातच वाळवावे. त्यानंतर प्रादुर्भाव किंवा उगवण झालेल्या शेंगा वेगळ्या काढून त्यांची मळणी करून घ्यावी.

## भाजीपाला पिके

- पेरणी
- रब्बी हंगामात भाजीपाला पिकाच्या लागवडीसाठी नियोजन करताना कंदवर्गीय भाज्यांमध्ये (मुळा, गाजर, बीट), पालेवर्गीय भाज्यांमध्ये (आंबट चुका, पालक, मेथी, शेपू, पोकळा) आणि फळवर्गीय भाज्यांमध्ये (वांगे, मिरची, टोमॅटो, वाटाणा, भेंडी, ढेमसा) या विविध प्रकारच्या भाज्यांची निवड करावी.

☎ ०२४२६ -२४३२३९
(प्रमुख, कृषिविद्या विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)